**वन विभागाचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत वन विभागाच्या क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी यांना मोबाईल व इंटरनेट डाटा वापराकरीता वाढीव रक्कम प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- एफएलडी-२०१९/प्र.क्र.२५८/फ-१०**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०२/०२/२०२४

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२००४/प्र.क्र.२१/फ-२, दिनांक ०५/१०/२०११.
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एमएससी-२००४/प्र.क्र.२१(भाग-३)/फ-२, दिनांक ०४/०८/२०१४.
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एफएलडी-२०१९/प्र.क्र.२५८/फ-१०, दि.२१/१०/२०२०.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१५/आयसीटी/सीयुजी-एम/प्र.क्र.१९० ए/४५३/२०२३-२४, दिनांक २९/१२/२०२३.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाच्या ई-प्रशासन धोरणाच्या धर्तीवर सन-२०११ मध्ये राज्य शासनाने ई-प्रशासन धोरण जाहीर केले आहे. सदरहू धोरणास अनुलक्षून राज्यातील वन विभागाचे संगणकीकरण करणेकरीता ICT प्रकल्प राबविण्याचा निर्णय संदर्भ क्र.१ व क्र.२ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

वन विभागाचे संगणीकरण कार्यक्रमांतर्गत Communication Network करीता स्थानिक स्तरावरील TSP (Telecom Service Provider) ची नेमणूक करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे विहीत करून संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना डाटा अपलोड करण्यासाठी स्वत:चा मोबाईल वापरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. याकरीता संबंधित वापरकर्त्यास मासिक खर्च रक्कम रु.१७०/- या प्रमाणे अनुज्ञेय प्रतिपुर्ती रक्कम प्रदान करण्याचा निर्णय संदर्भ क्र.३ वरील शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. त्यामध्ये आता अभिसरण योजना राबवितांना येणा-या संभाव्य अडचणींवर उपयोजना करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), म. रा. यांच्या अभ्यासगटाने क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांना भ्रमणध्वनी वापर व इंटरनेट डाटा वापराकरीता रु.१७०/- ऐवजी रु.३५०/- प्रती महिना देण्याकरीता शिफारस केलेली आहे. त्यानुसार प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये शासनास विनंती केलेली आहे. यास्तव, क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांना भ्रमणध्वनी करीता इंटरनेट डाटा सुविधा पुरविण्याकरीता रु.१७०/- ऐवजी रु.३५०/- प्रती महिना वाढीव मानधन/ रक्कम देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व याबाबत आता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

१. वनविभागात क्षेत्रीय स्तरावर कार्यरत वनरक्षक/वनपाल/वनपरिक्षेत्र अधिकारी/सहाय्यक वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांना शासकीय कामाकरीता वैयक्तिक मोबाईल व इंटरनेट वापराकरिता मासिक रु. ३५०/- (रुपये तीनशे पन्नास फक्त) रक्कम शासनाकडून अनुदेय राहील. याकरिता त्यांना स्थानिकरित्या उपलब्ध कोणत्याही दुरसंचार सेवा पुरवठादाराकडील TSP (Telecom Service Provider) ची सेवा घेण्याची मुभा राहील.

२. संबंधित क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत सदर प्रणालीत डाटा निरंतर अपलोड करणे अत्यावश्यक असून या बाबत सुनिश्चितता ठेवून त्याचे पर्यवेक्षण व सनियंत्रन करण्याची जबाबदारी संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी/सहायक वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांची राहील.

३. या करीता अंदाजे एकूण रक्कम रु. ५.०० कोटी इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सदरहू खर्च वन विभागाचे संगणकीकरण करणे (२४०६ ८६६९) या लेखाशिर्षा अंतर्गत इतर खर्च (५०) या सविस्तर शिर्षातून भागविण्यात येईल.

४. शासन निर्णय एफएलडी-२०१९/प्र.क्र.२५८/फ-१०, दि.२१/१०/२०२० मधील तरतुदी / अटी व शर्ती अनुज्ञेय राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२०२१७५०११८९१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( गणेश जाधव )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२
६) संचालक, एम.आर.एस.सी, नागपूर
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ, नागपूर.
१०) महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक/उपवनसंरक्षक
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१४) नॅशनल इन्फोर्मेटीक सेंटर,११ वा मजला, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -३२
१५) व्यवस्थापकीय संचालक, भारत संचार निगम लिमिटेड, मुंबई
१६) सह संचालक, कोषागार कार्यालय, नागपूर
१७) राष्ट्रीय सूचना केंद्र, नागपूर
१८) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१९) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
२०) प्रधान सचिव (वने) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२१) वन विभागातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२) निवडनस्ती फ-१० कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.